# शिर्के प्रशालेला 'माय फ्रेंड गणेशा'

## आसमंत-आर्ट सर्कल; बालदोस्तांनी साकारल्या पर्यावरणपूरक मूर्ती

सकाळ वृत्तसेवा



रत्नागिरी : शिर्के प्रशालेच्या विद्यार्थ्यांना विजेता करंडक प्रदान करताना आसमंत बेनवोलन्स फाउंडेशनचे नंदकुमार पटवर्धन. शेजारी विक्रम परांजपे, सुनील वणजू आदी.

रत्नागिरी, ता. २७ : आसमंत बेनवोलन्स फाउंडेशन आणि आर्ट सर्कल आयोजित 'माय फ्रेंड गणेशा' गणेशमूर्ती स्पर्धेत बालदोस्तांनी उत्तम गणेशमूर्ती साकारल्या. दोन-तीन तासांत शाडूच्या मातीला आकार देत सुरेख मूर्ती साकारून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेला पाठबळ दिले. प्रथमच सर्वाधिक पारितोषिके मिळवणाऱ्या शिर्के प्रशालेला विजेता करंडक देऊन गौरविण्यात आले.

पटवर्धन हायस्कूलमध्ये रविवारी (ता. २६) स्पर्धा झाली. ही स्पर्धा सात वर्षे घेण्यात येत आहे. शहर, परिसरातील शाळांमधील ६३ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. यापूर्वी स्पर्धक विद्यार्थ्यांकरिता श्रीकांत ढालकर यांनी मूर्ती घडवण्यापूर्वी लागणारा विचार, घडवताना वापरण्याचे तंत्र, या कामी वापरण्यात येणारी उपकरणे, पूर्वतयारी याबाबत मार्गदर्शन केले. देवरूखच्या डी कॅडचे चित्रकार विक्रम परांजपे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आसमंत बेनवोलन्स फाउंडेशनचे प्रमुख व नामवंत उद्योजक नंदकुमार पटवर्धन, विक्रम परांजपे आणि आर्ट सर्कलचे दादा वणजू यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

निकाल असा : पाचवी ते सातवी- रोहन संतोष पाडावे (शिर्के प्रशाला), प्रतीक संजय कीर (फाटक हायस्कूल), संचित सचिन विचारे (पटवर्धन हायस्कूल), आठवी ते दहावी- प्रतीक महेंद्र पाडावे (शिर्के प्रशाला), रितेश विश्वजीत सावंत (फाटक हायस्कूल), आदित्यराज विनोद शिंदे (जीजीपीएस), उत्तेजनार्थ मुग्धेश प्रफुल्ल पाथरकर (शिर्के प्रशाला). मागील वर्षीच्या विजेत्यांचा विशेष गट- चिन्मय पुरुषोत्तम वैद्य (पटवर्धन हायस्कूल), सूरज विलास रामाणे (शिर्के प्रशाला), साहिल महेंद्र खानविलकर (केशव परशुराम अभ्यंकर मूकबधिर विद्यालय).